वर्ष १२ वे * अंक ५० वा * गुरुवार, दि. १५ मे २०२५ ते बुधवार, दि. २१ मे २०२५ * रायगड * महाराष्ट्र * मुल्य २ रुपये * पृष्ठे ४

बातम्या आणि जाहिरातीसाठी
संपर्क साधा :- ८३६९३९४३७२
सा.रायगड लोकधारा वृत्तपत्र /
रायगड लोकधारा न्यूज चॅनल

अन्यायाला वाचा फोडणारे....
ज्वलंत एकमेव वृत्तपत्र....
रायगडसह मुंबई, नवी मुंबई मधून प्रकाशित...!
शब्दांना लेखणीची धार..!

# रायगड लोकधारा

RNI No. MAHMAR/2013/48622
संपादक: विजय चंद्रकांत गायकर

# पिण्याचं पाणी बिल्डरांच्या घशात

## नगरपालिकेच्या कृपाशीर्वादानं 'नळ टू बांधकाम साइट'



**सा.रायगड लोकधारा वृत्त/उरण प्रतिनिधी :** उरणमध्ये नागरिक थेंबथेंब पाण्यासाठी तडफडतायत आणि दुसरीकडे बिल्डर लोक नळाच्या पाण्यानं इमारती उभ्या करतायत, असा आरोप उरणकरांकडून करण्यात येत आहे. हे नेमकं काय चाललंय? नागरिकांना झपाट्यानं पाणीकपात, पण बिल्डरांना मुबलक पाणी, नगरपालिकेच्या अनागोंदी कारभारावर सर्वसामान्यांमधून टीकेची झोड उठविण्यात येत आहे. शहरात पुनर्विकासाचं सोंग आणून जुन्या इमारती पाडल्या जातायत, नव्या टॉवर्स उभे राहातायत आणि या सगळ्या बांधकामांना लागणारं पाणी सरळ नगरपालिकेच्या नळांतून पुरवलं जातंय, असा संतप्त आरोप उरणकरांनी केला आहे. टँकरचं नाव नाही, टँकरचं काम नाही. मग हे बांधकाम पाणी कुठून घेतं? उत्तर स्पष्ट आहे. जनतेसाठी असलेल्या पाईपलाइनमधूनच हे बिल्डर पाणी चोरतायत. आणि पालिकेचे अधिकारी मस्त झोपलेत की मुद्दाम डोळेझाक करतायत? असा सवाल जनतेतून केला जात आहे. धरणात पाण्याची पातळी घटतेय, उन्हाळ्याने कडकडून तापलंय, नागरिकांना दिवसाआड पान २ वर



**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

संघटन कौशल्य, कार्यक्षमता व पक्षशिस्त म्हणून सुपरिचित असलेले अविनाश कोळी यांची भारतीय जनता पार्टीच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्निवड झाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.



# अविनाश कोळी यांची भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्निवड

**सा.रायगड लोकधारा वृत्त/**



**पनवेल प्रतिनिधी :** संघटन कौशल्य, कार्यक्षमता व पक्षशिस्त म्हणून ओळखले जाणारे अविनाश कोळी यांची भारतीय जनता पार्टीच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्निवड करण्यात आली आहे. प्रदेश भाजपच्यावतीने आज राज्यातील जिल्हाध्यक्षांची निवड जाहीर करण्यात आली असून पुढील वाटचालकरीता शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत. त्यांच्या पुनर्नियुक्तीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी ही निवड अत्यंत फलदायी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रातील विविध जिल्हाध्यक्षांच्या निवड प्रक्रिया नुकतीच पार पाडली आहे. पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी व स्थानिक पातळीवर प्रभावी नेतृत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने या निवडी करण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता व कार्यक्षमता राखण्यासाठी पक्षाने ठोस निकष निश्चित केले, त्यामध्ये जिल्हाध्यक्ष पदासाठी ६० वर्षांखालील उमेदवारांनाच प्राधान्य देण्यात आले आहे. पान २ वर

# तीन धक्कादायक गुन्ह्यांची मालिका ऑनलाईन फसवणूक, घरफोडी आणि चोरी

**सा.रायगड लोकधारा वृत्त/**



**पनवेल/संजय कदम :** खारघर व आसपासच्या भागात गुन्हेगारीच्या तीन गंभीर घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. सेवानिवृत्त नागरिकाची ऑनलाईन फसवणूक, बंद घरात घरफोडी आणि झोपलेल्या तरुणाच्या खिशातील चोरी अशा घटना अलीकडेच उघडकीस आल्या आहेत.१. सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाची एक कोटी पाच लाखांची ऑनलाईन फसवणूकखारघर सेक्टर २० येथील ट्विन्स सोसायटीमध्ये राहणाऱ्या ६४ वर्षीय सेवानिवृत्त उपाध्यक्षाची तब्बल ₹१.०५ कोटींची फसवणूक झाली आहे. अज्ञात भामट्यांनी शेअर्स ट्रेडिंगमधून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून विविध बँक खात्यांत पैसे भरायला लावले. बनावट संकेतस्थळावर पैसे वाढल्याचे दाखवून विश्वास संपादन केला. मात्र, पैसे परत मागितल्यावर ते परत मिळाले नाहीत. नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम या प्रकरणाचा तपास करत आहेत.२. खांदेश्वरमध्ये बंद घर फोडून साडेतीन लाखांची चोरीन्यू राजहंस पान २ वर

# पी.पी. खारपाटील विद्यालयात मुलींची बाजी



**सा.रायगड लोकधारा वृत्त/चिरनेर प्रतिनिधी :** उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील मराठी माध्यमातील आणि ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यात मराठी माध्यमाचा निकाल ९४.९३ टक्के आणि इंग्रजी माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला असून दोन्ही माध्यमातून मुलींनीच बाजी मारली आहे. यावेळी मराठी माध्यमातून भूमिका ठाकूर हिने ९५.२० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. तर, पायल पाटील ९०.२० टक्के आणि प्रेरणा पाटील ८९.४०% गुण मिळवून तिसरी आली आहे. तसेच, इंग्रजी माध्यमाच्या संकुलनातून मानसी जोशी हिने ९१.६० टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. तर, सानवी मोकल ९१ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि मोनिका पडवळ ९०.६० टक्के गुण मिळवून तृतीय आली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि गुणानुक्रमे उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष पी.पी.खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, चेअरमन समीर खारपाटील, सचिव सागर खारपाटील, संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासकीय अधिकारी व्ही.ए. पाटील, मिलिंद पट्टेबहादूर, आनंद चिर्लेकर, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मंदा घरत, स्मिता मसुरकर, विद्या संकुलनाचे सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# पाली : सुधागड येथे अनधिकृत माती उत्खनन

## तहसीलदार उत्तम कुंभार यांचा चौकशी आदेश



**सा.रायगड लोकधारा वृत्त/सुधागड-पाली :** सुधागड तालुक्यात अनधिकृत माती उत्खनन मोठ्या प्रमाणावर सुरू असून, शासनाच्या रॉयल्टीशिवाय उत्खनन होत असल्याचे समोर आले आहे. दैनिकांमध्ये या संदर्भात वृत्त प्रसिद्ध केले होते, मात्र वारंवार प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांनंतरही ठोस कारवाई झाली नसल्याने पर्यावरण प्रेमी आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. तालुक्यातील सर्व मंडळ विभागात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उत्खनन सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. यावर तहसीलदार उत्तम कुंभार यांनी मंडळ अधिकारी आणि तलाठी यांना सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. तहसीलदारांनी संबंधित उत्खननधारकांकडून शासनाकडे रॉयल्टी जमा केली आहे की नाही, याची पडताळणी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, अनधिकृत गौणखनिज उत्खनन निदर्शनास आल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्याचे आदेशही दिले आहेत. याआधी सुधागडमध्ये अनेक ठिकाणी अशा प्रकारचे आदेश दिले गेले आहेत, पण कारवाई होण्याचा वेग अत्यंत संथ असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. हा आदेश कार्यक्षमपणे राबवला जाणार का, की पुन्हा कागदावरच राहणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. पर्यावरणप्रेमींनी महसूल विभागासह कोकण आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी या विषयात तातडीने लक्ष घालावे, अन्यथा मोठ्या प्रमाणावर शासनाच्या महसुलाचे नुकसान होण्याची शक्यता आहे, असे ठाम मत व्यक्त केले आहे. आदेश दिले गेले आहेत, पण प्रशासनाची पुढील अंमलबजावणी किती परिणामकारक ठरणार, हे पाहण्याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून

## पिण्याचं पाणी बिल्डरांच्या घशात

पाणी मिळतंय. पण, बिल्डरांच्या बांधकामांना मात्र मुबलक पाण्याची 'सुविधा'! ही सुविधा आहे की सौदा? असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे. जनतेच्या तोंडचं पाणी बिल्डरांच्या घशात? असा थेट सवाल विचारला जातोय. नगरपालिका आणि बिल्डरमधलं हे 'पाईपलाईन कनेक्शन' तातडीने तोडलं पाहिजे, आणि नळाचं पाणी वापरणाऱ्या बिल्डरांवर तडकाफडकी कारवाई झाली पाहिजे, अशी एकमुखी मागणी उरणकरांकडून करण्यात येत आहे. ❋❋❋❋

## अविनाश कोळी यांची भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्निवड

अविनाश कोळी यांचे संघटनात्मक कार्यासाठी नियोजन उत्तम प्रकारचे असते. पक्षाचे ध्येय धोरण आणि उपक्रमे नेहमीच यशस्वी करत त्यांनी यापूर्वीही जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी चोख पार पाडली आहे. तसेच निवडणुकाही जिंकण्यात त्यांनी जिल्हाध्यक्ष म्हणून उत्कृष्ट काम केले आहे. त्याचबरोबरीने संघटनात्मक जबाबदारीने काम केले आहे. त्यामुळे त्यांची महाराष्ट्र प्रदेश भाजपने पुनर्निवड जाहीर केली आहे. ❋❋❋❋

## तीन धक्कादायक गुन्ह्यांची मालिका ऑनलाईन फसवणूक, घरफोडी आणि चोरी

सोसायटी, आदई येथे राहणारे श्रीकांत पाटेकर हे कामासाठी बाहेर असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातून ३० ग्रॅमचे सोन्याचे दागिने व ₹१.१० लाखांची रोख रक्कम असा एकूण ₹३.५ लाखांचा ऐवज लंपास केला. खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून चोरट्यांचा शोध सुरू आहे.३. दुचाकीवर झोपलेल्या तरुणाच्या खिशातील चोरीसिद्धेश रेशीम (३०), सेक्टर १५, खारघर येथे राहणारा एक मेकॅनिक, खारघर टोल नाक्याच्या मागे दुचाकीवर झोपलेला असताना, अज्ञात चोरट्याने त्याच्या खिशातून मोबाईल, गळ्यातील सोन्याची चेन आणि ₹ ३,००० रोख चोरले. सकाळी ४.३० च्या सुमारास पोलिसांनी त्याला उठवल्यानंतर ही चोरी उघडकीस आली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ❋❋❋❋

## पनवेल परिसरात गुन्हेगारी घटनांचा सुळसुळाट : स्कुटी चोरी, रिक्षा चालकावर हल्ला आणि डिझेल चोरीच्या घटना उघडकीस




**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल/संजय कदम :** पनवेल शहरात मागील काही दिवसांत गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होताना दिसत असून, एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या ठिकाणी चोरी आणि हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. (१) होंडा ॲक्टीव्हा स्कुटीची चोरीपनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील रिक्षा स्टँडजवळ उभी करून ठेवलेली केतन गोसावी यांची काळ्या रंगाची होंडा ॲक्टीव्हा (MH-०६ AT ४१५२) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. या स्कुटीची किंमत अंदाजे १०,००० रुपये असून, याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. (२) रिक्षा चालकावर ब्लेडने हल्लारेल्वे स्टेशन परिसरातील साई मंदिराजवळ, आशिक आलम शेख (३५, रा. नवनाथ झोपडपट्टी) या रिक्षाचालकास चार अनोळखी इसमांनी दारू पिण्यासाठी पैसे मागितले. पैसे न दिल्यामुळे संतप्त आरोपींनी संगनमत करून त्याच्यावर हल्ला केला. हाताने मारहाण केल्यानंतर चेहऱ्यावर ब्लेडने वार करून गंभीर जखमी केले. पीडित रुग्णालयात उपचार घेत असून याप्रकरणीही पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. (३) टँकरमधून डिझेल चोरी विजयकुमार अजोरपाल, जे ठाणे जिल्ह्यात राहतात, हे टँकर (MH ४३ CE १६८८) चालक आहेत. त्यांनी कर्नाटकमधून माल घेऊन तळोजा परिसरात माल खाली करण्यासाठी येत असताना, एशियन पेंट कंपनीजवळ रात्री गाडीत झोपले होते. सकाळी जागे झाल्यावर डिझेलचा वास येत असल्याचे लक्षात येऊन पाहणी केली असता, टँकरमधून मोठ्या प्रमाणात डिझेलची चोरी झाल्याचे आढळून आले. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. ❋❋❋❋ ❋❋❋❋

# सुभाष मोरे यांचा आत्मदहनाचा प्रयत्न

**सा.रायगड लोकधारा वृत्त/ महाड प्रतिनिधी :** महाड मध्ये मटका, जुगार, भिंगरूट अशा प्रकारचे अवैध व्यवसाय सुरु असून पोलिसांनी याला बंद करावेत नाही तर प्रशासनाच्या विरोधात मंगळवारी आत्मदहन करणार असल्याचा इशारा समाजसेवक सुभाष मोरे यांनी दिला होता. त्याप्रमाणे त्यांनी मंगळवारी १२ वाजता महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला. महाड तालुक्यामध्ये मटका, जुगार, भिंगरूट अशा प्रकारचे अवैध व्यवसाय सुरु असून, हे पोलीस प्रशासनाने बंद करावेत, अशी मागणी सातत्याने समाज सेवक सुभाष मोरे यांनी करूनदेखील पोलिसांच्या आशीर्वादाणे हे सुरूच राहिले.जर हे बंद झाले नाहीतर आज महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दुपारी १२ वाजता आत्मदहन करण्याच्या इशारा त्यांनी दिला होता. त्याप्रमाणे ते हातात डिझेलने भरलेला कॅन घेऊन पोलीस ठाणे हद्दीत येऊन आपल्या अंगावर डिझेल ओतून पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलीस प्रशासनाला अगोदरच याची खबर असल्याने



त्यांनी धाव घेत पेटवून घेण्याअगोदरच त्याला ताब्यात घेतले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला. महत्त्वाचे म्हणजे, महाड शहर पोलीस स्टेशनमधील इतिहासातील पहिलीच आत्म दहन करण्याची घटना आहे. या घटनेनंतर महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव, नगरपालिकेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, सुभाष मोरे यांच्या मागणीनुसार पुढील कारवाईचे आश्वासन महाड शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी संतोष जाधव यांनी दिली आहे. ❋❋❋❋ ❋❋❋❋

# महाडजवळ भीषण अपघातः आयशर टेम्पो व रिक्षाची समोरासमोर धडक १३ वर्षीय मुलाचा मृत्यू, आठ जण गंभीर जखमी



**सा.रायगड लोकधारा वृत्त/ महाड प्रतिनिधी :** अवकाळी पावसाचा फटका राज्य मार्गावर झालेल्या चिखलामुळे आयशर टेम्पो व विक्रम रिक्षा अपघातात एक जण जागीच ठार तर आठ जण गंभीर रित्या जखमी झाले असून या जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे तर दोघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना मुंबई येथे उपचारासाठी नेण्यात आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की महाड येथून विन्हेरे गावाकडे. MH ०६ S ३६२५ या विक्रम रिक्षाचा चालक सुधीर गीजे हा ४ वाजण्याच्या सुमारास बिज घर गावाजवळ दापोली कडून मुंबईकडे येणाऱ्या आयशर टेम्पो चालकाचे उतारा मध्ये गाडीवरील नियंत्रण सुटल्याने त्याने थेट समोरून येणाऱ्या विक्रम मिनी डोर रिक्षाला समोर धडकल्याने रिक्षा बाजूच्या गटारात जाऊन



उभी राहिली आयशर टेम्पो चालकाने मिनी डोअर रिक्षाला दिलेल्या जोराच्या धडकेमध्ये या रिक्षातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांपैकी मंथन रवींद्र भिलारे हा तेरा वर्षाचा मुलगा जागीच ठार झाला तर अन्य जन गंभीर जखमी झाले. मिनी डोअर रिक्षा मधून प्रवास करणाऱ्या व गंभीर जखमी झालेल्या व्यक्तींची नावे पुढील प्रमाणे; (१) राजेंद्र सखाराम भिलारे राहणार शिरवली वय वर्षे ३५ (२) अर्चना रुपेश धोत्रे राहणार महाड वय वर्षे २७ (३) रियांश अभिषेक रेडीज वय वर्षे ७ राहणार मुंबई दहिसर (४) श्रद्धा श्रीकांत मापुसकर राहणार विन्हेरे वय वर्षे ६० (५) सुधीर गंगाराम गीजे राहणार विन्हेरे वय वर्षे ३९ (६) श्रीकांत विठोबा मापुस्कर वय वर्षे ६५ राहणार विन्हेरे (७) श्रेयशी अभिषेक रेडीज राहणार विन्हेरे वय वर्षे ३७ (८) मंथन रवींद्र भिलारे वय वर्षे १३ हा या अपघातात गंभीर जखमी झाल्याने जागीच मृत पावला या अपघातानंतर टेम्पो चालक गाडी सोडून पळून गेला आहे. याबाबत महाड तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस अधिक तपास करीत आहेत. ❋❋❋❋

# रुग्णांच्या सुदृढतेसाठी परिचारिकांचे समर्पण कौतुकास्पद




**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** रुग्णालयात रुग्ण उपचारासाठी दाखल झाल्यानंतर त्याच्या नातेवाईकांइतकीच काळजी परिचारिकांकडून घेतली जाते. डॉक्टर वैद्यकीय उपचार करतात, त्याबरोबरच रुग्णांसाठी अहोरात्र जागणाऱ्या परिचारिकांचे समर्पण म्हणजे खरोखरच कौतुकास्पद असते, असे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले. आद्यपरिचारिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्मदिवस सर्वत्र आंतरराष्ट्रीय नर्सेस दिन म्हणून साजरा केला जातो. याच नर्सेस दिनाचे औचित्य साधून पनवेल येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयातील परिचारिकांप्रती ऋण व्यक्त करण्यासाठी पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम झाला. असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष केवल महाडिक यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रुग्णालयातील नर्सेसना गुलापुष्प आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. पत्रकार मित्र असोसिएशन प्रत्येकाने समाजाप्रती केलेल्या कार्याची दखल वेळोवेळी घेत असते. नर्सेस दिनाच्या निमित्ताने आमचा केलेला सत्कार निश्चितच पुढील कार्यासाठी प्रेरणा देईल, असे उद्गार सत्कारार्थींनी व्यक्त केले. यावेळी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवाजी पाटील, डॉ. प्रमोद पाटील, सहायक अधिसेविका ज्योती गुरव यांच्यासह अधिकारी तसेच पत्रकार मित्र असोसिएशनचे अध्यक्ष केवल महाडिक, कार्याध्यक्ष नितीन जोशी, अनुराग वाघचौरे उपस्थित होते. ❋❋❋❋ ❋❋❋❋ ❋❋❋❋

# नवी मुंबई पोलिसांचे आणखी एक पाऊल पुढे

## नागरिकांना नेहमी भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे 'चॅटबॉट'द्वारे एका क्लिकवर मिळणार

**सा.रायगड लोकधारा वृत्त/**

**पनवेल प्रतिनिधी :** नवी मुंबई पोलीस दलाने नागरिकांशी समाज माध्यमाद्वारे संवाद साधण्याच्या प्रक्रियेत आणखी एक नवे पाऊल टाकले आहे. पोलिसांनी नागरिकांना घरबसल्या पोलीस दलाविषयी तसेच पोलिसांच्या कार्य पद्धतीविषयी कुठल्याही प्रकारची माहिती मिळवता यावी, यासाठी चॅटबॉट सेवा सुरु केली आहे. त्यामुळे नागरिकांना नेहमी भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे 'चॅटबॉट'द्वारे एका क्लिकवर मिळणार आहेत. चॅटबॉट सेवा सुरु करणारे नवी मुंबई राज्यातील पहिले पोलीस आयुक्तालय ठरले आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नागरिकांना सेवा-सुविधा देण्यामध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यासाठी नवी मुंबई पोलीस दल कायम अग्रेसर राहिले आहे. सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या जमान्यात नवी मुंबई पोलीस दलाने चॅटबोट सेवा सुरु करुन नागरिकांशी समाज माध्यमाद्वारे संवाद साधण्याच्या प्रक्रियेत आणखी एक नवे पाऊल टाकले आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या प्रयत्नाने सुरु करण्यात आलेल्या या 'चॅटबॉट'चे उद्घाटन नुकतेच राज्याचे गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम यांच्या हस्ते झाले. नवी मुंबई पोलिसांच्या अधिकृत वेबसाईटद्वारे नागरिकांना 'चॅटबॉट'ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नागरिकांना पोलीस दलाशी संबंधित माहिती, कार्यपद्धती, तक्रार प्रक्रियेची माहिती तसेच विविध पोलीस सेवा याबाबत त्वरित मार्गदर्शन मिळणार आहे. सदर सेवा २४/७ उपलब्ध असून, नागरिकांना त्यांच्या स्मार्टफोन, संगणक किंवा टॅबलेटवरुन या 'चॅटबॉट'द्वारे नवी मुंबई पोलिसांशी संवाद साधता येणार आहे. सदर उपक्रमामुळे नागरिकांना पोलीस स्टेशनमध्ये प्रत्यक्ष जाण्याची गरज न पडता अनेक शंका आणि चौकशी 'चॅटबॉट'द्वारे करता येणार आहे. विशेष म्हणजे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेतून नागरिकांना संवाद साधता येणार आहे. एआय 'चॅटबॉट'चा वापर करण्यासाठी नवी मुंबई पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळावर उजव्या बाजूला खालील बाजूस नवी मुंबई पोलीस हेल्पवर क्लिक केल्यानंतर चॅटबॉट पेजवर जाता येणार आहे. या 'चॅटबॉट'मध्ये नागरिकांना पोलीस सेवांशी संबंधित प्रश्न विचारुन माहिती घेता येणार आहे. तसेच वरच्या बाजूला असलेल्या चॅट नाऊवर क्लिक करुन चॅट शॉटसोबत संवाद देखील साधता येणार आहे.




### 'चॅटबॉट'द्वारे मिळणाऱ्या सुविधा...

गुन्हे टाळण्यासाठी सुरक्षा टिप्स आणि सायबर सुरक्षा, फिशिंग, ऑनलाईन फसवणूक, चोरी इत्यादी गुन्ह्यांवर प्रतिबंधक उपाय सांगितले जाणार आहे. तसेच नवीन गुन्हेगारी पद्धतींबद्दल नागरिकांना सतर्क केले जाणार आहे. पोलीस स्टेशनचे तपशील, केसची प्रगती, दस्तऐवज आवश्यकता आदी माहिती सहज शोधता येणार आहे. ऑनलाईन एफआयआर, पासपोर्ट व्हेरिफिकेशन आणि इतर सेवांसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. नागरिकांना योग्य अधिकाऱ्यांशी किंवा विभागाशी जोडले जाणार आहे. पोलीस आणि नागरिक यांच्यात पारदर्शक संवाद वाढविण्यासाठी चॅटबॉट वापरला जाणार असून नागरिक त्यांच्या सूचना, तक्रारी किंवा प्रश्न थेट पोलिसांशी सामायिक करु शकणार आहेत.

---

# डेब्रीज टाकण्यासाठी आलेले ४ डंपर जप्त

## चालकांवर कारवाई; उलवे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल



**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** 'सिडको'ने संपादित केलेल्या जमिनीवर आणि भूखंडावर मानवी आरोग्यास धोकादायक तसेच पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रीज टाकणाऱ्या डंपर चालकांची 'सिडको' कडून धरपकड सुरुच आहे. उलवे परिसरातील 'सिडको'च्या मोकळ्या भूखंडावर डेब्रीज टाकण्यासाठी आलेले ४ डंपर 'सिडको'च्या पथकाने उलवे येथील अटल सेतूजवळ पकडले. त्यानंतर सदर ४ डंपर चालकाविरोधात उलवे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करुन सर्व डंपर जप्त केले आहेत. 'सिडको'च्या भूखंडावर अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात डेब्रीज टाकण्यात येत असून सदरचे डेब्रीज मानवी आरोग्यास धोकादायक आणि पर्यावरणास हानीकारक असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे 'सिडको'च्या भूखंडावर अनधिकृतपणे डेब्रीज टाकणाऱ्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली 'सिडको'चे दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग आणि पोलीस पथकाकडून जोरदार कारवाई सुरु करण्यात आली आहे. मुंबई येथून अटल सेतूमार्गे मानवी आरोग्यास हानिकारक असलेले डेब्रीज टाकण्यासाठी ४ डंपर उलवे भागात आले होते. याबाबतची माहिती सिडकोच्या पथकाला मिळाल्यानंतर पथकाने उलवे येथील अटल सेतूजवळ धाव घेऊन डेब्रीजने भरलेले ४ डंपर ताब्यात घेतले. या कारवाईत पकडण्यात आलेल्या सुभाषचंद्र यादव (२६), सुरजकुमार पाल (२७), आझाद सिंग (२८) आणि ३५ वयोगटातील चालक या चारही डंपर चालकाविरोधात उलवे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# पनवेल येथे तळोजा परिसरात टँकरमधून डिझेलची चोरी



**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** कर्नाटकातून तळोजा परिसरात माल खाली करण्याकरिता आलेल्या टँकरमधून डिझेलची चोरी झाल्याची घटना घडली आहे. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. विजयकुमार अजोरपाल हे ठाणे जिल्ह्यात राहत आहेत. हे कळंबोली येथील टँकर क्रमांक एमएच ४३ सी.ई १६८८ या गाडीवर टँकर चालक आहेत. विजयकुमार यांनी बी.पी. कोगनोली, नॅशनल हायवे आप्पाचीवाडी क्रॉस कोगनोली या पंपावर २१८ लीटर डिझेल भरले होते. मँगलोर कर्नाटक राज्यातून तळोजा एम.आय.डी.सी. येथे माल खाली करण्यासाठी आले होते. यावेळी तळोजा एम.आय.डीसी. येथील एशियन पेंट कंपनीच्या जवळ रात्र झाल्यामुळे ते गाडीतच झोपले. सकाळी उठल्यानंतर डिझेलचा वास येऊ लागल्यामुळे पाहणी केली असता डिझेलची चोरी झाल्याचे लक्षात आले. याबाबतची माहिती त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात दिली आहे.




# पनवेल येथे धावत्या बसमध्ये चोरी करणारा अटकेत

## कामोठे पोलीस ठाण्यात चोरीच्या घटनांची नोंद



**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** मुंबई पूणे द्रुतगती महामार्गावर धावत्या खासगी ट्रॅव्हल्स बसमधील महिला प्रवाशांची पर्स चोरीतून लाखोंचा मुद्देमाल चोरणाऱ्या चोरट्याला कामोठे पोलिसांच्या पथकाने अखेर अटक करुन त्याची रवानगी तळोजा मध्यवर्ती कारागृहात केली. मूळ गुजरात येथे राहणारा आकाश पटेल असे या ३२ वर्षीय संशयीत चोरट्याचे नाव आहे. मार्च आणि एप्रिल महिन्यात चार वेगवेगळ्या चोरीच्या घटनांची नोंद महिला प्रवाशांनी कामोठे पोलीस ठाण्यात केली होती. एक सारख्याच पद्धतीने चोऱ्या वाढल्यामुळे कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी चोरट्याला पकडण्यासाठी खास पोलिस पथकाची नेमणूक केली. अथक तपासानंतर अखेर लोणावळा येथील एका हॉटेलमध्ये संशयित थांबल्याची माहिती मिळाल्यानंतर कामोठे पोलिसांनी हॉटेलमधील वेटरचे कपडे घालून सापळा रचला. पहाटे सहा वाजता संशयित आल्यावर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने १५ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरल्याचे कबूल केले. आकाश हा सूरत (गुजरात) येथील बारडोली तालुक्यातील वराड या गावचा मूळ रहिवाशी आहे. आकाश हा द्रुतगती महामार्गावरील टोलनाक्याच्या काही अंतरापुढे स्वतःचे वाहन बिघडल्याचे सांगून खासगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसला थांबवून त्या बसमध्ये प्रवाशांप्रमाणे चढल्यानंतर सीट मोकळी आहे का हे बघण्याच्या बहाण्याने स्लीपर सीटसमोरील पडदे उघडून झोपलेल्या महिलांच्या पर्स चोरत होता. काही मिनिटांनी तो मागून त्याची मोटार येत असल्याचा बहाणा करुन द्रुतगती महामार्गावरील दुसरा टोलनाका येण्याच्या पूर्वी बसमधून उतरत असे. त्यामुळे तो टोलनाक्यावरील सीसीटिव्ही कॅमेरांमध्ये कैद झाला नाही.

# श्रीवर्धनमध्ये महावितरणचे शटडाऊन तापदायक

## ▌वाळवटी विभागातील ४७ गावांना फटका ▌देखभाल, दुरुस्तीसाठी वीज खंडित



**सा.रायगड लोकधारा वृत्त/दिघी प्रतिनिधी :** एकीकडे सूर्य आग ओखत आहे. वातावरणात प्रचंड उकाडा सुरू झाला आहे. त्यात आणखी भर म्हणून देखभाल व दुरुस्तीसाठी श्रीवर्धन वाळवटी सेक्षांची मंगळवारी दिवसभर वीज खंडीत करण्यात आली. त्यामुळे सर्वसामान्यांचे प्रचंड हाल होत असून, आता घराबाहेर ही पडवेना आणि घरातही बसवेना अशी अवस्था सर्वसामान्यांची झाली आहे. वातावरणातील तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने श्रीवर्धन तालुका चांगलाच तापला आहे. महावितरणकडून देखभाल व दुरूस्तीसाठी महिन्यातून तीन-चार वेळा वीजपुरवठा बंद करण्यात येतो. त्यामुळे सर्वसामान्यांना व विशेषतः ग्रामीण भागातील जनतेचे मोठ्या प्रमाणावर हाल सुरू आहेत. कारण ग्रामीण भागात मोल मजुरीने कमी उत्पन्नात आपल उदरनिर्वाह करणारे कुटुंब इन्व्हर्टरसारख्या सुविधा देखील उपलब्ध करू शकत नाही. त्यामुळे एसी, कुलर या गोष्टी खरेदी करणे खूपच लांब राहिल्या. सुरक्षिततेच्या दृष्टीने वीज बंद केली जाते. मात्र, बहुतांश वेळा यंत्रणेतील बिघाडामुळे वीज जाण्याचे प्रकार होत असतात. वीजउपकेंद्र, रोहित्रांमध्ये बिघाडही होतात. दुरुस्ती व देखभालीच्या कारणास्तव विशिष्ट दिवशी कामे केली जात नाही, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनमानी प्रमाणे वीजपुरवठा बंद केला जातो. ऐन गरजेच्या वेळी वीज जाण्याचे प्रकार का होतात, असा प्रश्न उपस्थित केला जातो. त्याला 'महावितरण'ची यंत्रणा काही प्रमाणात जबाबदार असल्याचा आरोप होतो आहे. श्रीवर्धन तालुक्यातील महावितरण कंपनीकडून

> मंगळवारी दुरूस्तीसाठी वीज पुरवठा बंद करण्यात आला. लवकरच सुरू करण्यासाठी प्रयत्न करत आहोत.
>
> **– दीपक घुगे,**
> **महावितरण अधिकारी, वाळवटी सेक्शन.**

दुरुस्तीच्या कामासाठी होणारा खंडीत वीज पुरवठा या वाढत्या तापमानात कमी करण्यात यावा. येथील पर्यटन व्यवसायाच्या दृष्टीकोनातून त्याचा परिणाम जाणवत आहे. त्यामुळे कमी वेळात दुरूस्ती होऊन जनतेला विद्युत सेवा सुरळीत मिळावी अशी मागणी होत आहे.

### दुरूस्तीसाठी वेळापत्रक नाही

महावितरणकडून सोशल मीडियाच्या माध्यमातून वीज दुरुस्तीच्या सूचना समोर येतात. पण अशा पूर्वसूचना तालुक्यातील सर्वापर्यंत पोहचत नाही. गाव-वाड्यावरील जनतेला विद्युत सेवा किती तासाने सुरळीत होईल याची माहिती मिळत नाही. दिवसभर दुरुस्तीसाठी खंडीत केलेली वीज सायंकाळी ५ वाजता येणार अशी माहिती दिली जाते. मात्र, आणखी दोन ते तीन तास उशिराच सुरू करण्याचे काम महावितरण कंपनीकडून नेहमी होत आहे.

# वाहतूक कोंडीकडे शासनाचा कानाडोळा

## नेत्यांच्या भांडणात माणगावकरांची वाताहत

### तरुणांनी दिला आंदोलनाचा इशारा




**सा.रायगडलोकधारा वृत्त/ माणगाव प्रतिनिधी :** माणगाव तालुक्याला दोन मंत्री पदे मिळूनही शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही. राजकीय शह आणि काटशहच्या राजकारणात लोकांचे मरण स्वस्त आणि सोपे झाले आहे. दोघांच्या भांडणात शासनही कानाडोळा करत आहे. अपघातात दररोज लोकांचे नाहक बळी जात आहेत. याचे नेत्यांना सोयरसुतक नाही. त्यामुळे माणगाव शहरातील तरुणांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. रायगडच्या पालकमंत्री पदाचा प्रश्न अधांतरी लटकला आहे. तसाच माणगाव शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न लोकांच्या जीवांवर नाहक येत आहे. येथील स्थानिक प्रशासन हतबल आहे. नेत्यांनी कानावर हात ठेवले आहेत. यामध्ये जनता आणि व्यावसायिक प्रचंड भरडले जात आहेत. दररोज लहान मोठे अपघात होत आहेत. यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. तसेच तात्पुरती उपाययोजना देखील करण्यात आली नाही. माणगावची जनता म्हणजे मुके बिचारे, कोणीही हाका अशी बिकट अवस्था झाली आहे. एकवेळ पालकमंत्री पदाचा प्रश्न आपल्या राजकीय स्वार्थापोटी सोडवून घेतील. परंतु माणगावच्या वाहतूक कोंडीचा फेरा सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार नाहीत असे दिसते. काही महिन्यांपूर्वी माणगाव तहसील कार्यालयात आढावा बैठक झाली होती. परंतु पुढे कोणतीही कारवाई झाली नाही. पुन्हा एकदा माणगावला वाऱ्यावर सोडून दिले आहे. माणगावला दोन मंत्री मिळाले आहेत. परंतु वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिकच तीव्र होत आहे. दोन्ही घरचा पाहुणा उपाशीच राहीला आहे. यामुळे माणगावच्या जनतेची अवस्था ना घरका ना घाटका अशी झाली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई-गोवा महामार्गाचे रुंदीकरण करणाऱ्या ठेकेदारावर वेळेत काम पूर्ण न केल्याने तातडीने कारवाई करुन थेट गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर निविदा काढून दुसऱ्या ठेकेदाराला नियुक्त करण्यात आले आहे. तोपर्यंत मात्र पाऊस जवळ आला आहे. त्यामुळे पावसाळ्यात कामे होणार नाहीत. दरम्यान वाहतूक कोंडीतून किमान वर्षभर तरी सुटका होणार नाही असे दिसत आहे. मुंबईगोवा महामार्गाचा प्रश्न देशाच्या संसदेत आणि राज्याच्या विधानसभेत वारंवार उपस्थित केला गेला होता. परंतु १७ वर्षे झाली तरी लोकप्रतिनिधी हातावर हात ठेवून आहेत. हा संपूर्ण कोकणचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही हे दुर्दैव आहे. पत्रकार आणि सामाजिक संघटनांनी वेळोवेळी आंदोलन केली. त्यांना आश्वासनाचे गाजरं दाखविण्यात आली आहेत. या महा मार्गानंतर समृद्धी आणि पश्चिम महाराष्ट्रात विविध महामार्ग झाले. माणगाव मधील अवघड असा दिघी-पुणे महामार्ग झाला. परंतु या महामार्गाला मुहूर्त सापडलेला नाही. त्यामुळे विकासाच्या दृष्टीने २५ वर्षे कोकण मागे पडल्याचे वास्तव दिसत आहे. बांधकाम मंत्री छगन भुजबळ हे होते. तेव्हा पासून या महामार्गाचे काम सुरू झाले आहे. आजपर्यंत चार ठेकेदार तर पाच सरकारे आली तरीही या मार्गाला गती आणि चालना मिळाली नाही. सर्व बांधकाम मंत्री आणि मुख्यमंत्री येऊन आश्वासन देतात आणि पुढे काहीच होत नाही. याबद्दल प्रचंड संताप आणि राग लोकांच्या मनात आहे. मात्र उद्रेक होत नाही तोपर्यंत मनस्ताप सहन करावा लागणार आहे. माणगावमध्ये भादाव आणि कालवा मोरबा मार्गांचा पर्याय उपलब्ध आहे. परंतु नेत्यांची इच्छाशक्ती आणि आत्मियता दिसत नाही. नेत्यांच्या नाकर्तेपणामुळे हा मुंबई-गोवा महामार्ग रखडलेल्या अवस्थेत आहे. या दुरवस्थेबाबत कधी उद्रेक होईल हे सांगता येत नाही असे दिसत आहे.

# पनवेलमध्ये प्रथमच तीन दिवस 'आंबा महोत्सव'




**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून भारतीय जनता पार्टी पनवेल शहरच्यावतीने दिनांक १६ ते १८ मे पर्यंत पनवेलमध्ये प्रथमच 'आंबा महोत्सव' तसेच महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवानिमित्त सांस्कृतिक, मनोरंजन आदी कार्यक्रमे आयोजित करण्यात आले आहेत. शहरातील डॉ. पटवर्धन हॉस्पिटल समोरील गुजराती शाळेच्या मैदानावर तीनही दिवस आंबा महोत्सव होणार आहे. या महोत्सवाअंतर्गत शुक्रवार दिनांक १६ मे सायंकाळी ६ वाजता महिलांसाठी 'खेळ खेळूया साऱ्याजणी चला जिंकूया अस्सल पैठणी', शनिवार दिनांक १७ मे रोजी सायंकाळी ०७ वाजता 'अभंग रिपोस्ट' तर रविवार दिनांक १८ मे ला संगीत, नृत्य, कलेचा संगम असलेला 'वारसा संस्कृतीचा' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

या महोत्सवाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रम प्रमुख माजी नगरसेविका रुचिता लोंढे, भाजप पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंजारराव यांनी केले आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, विजय चंद्रकांत गायकर यांनी रोशन प्रिंटर्स, शॉप नं.०४ / ०५, प्रकाश निवास, प्लॉट नं.१३४/ ०१, आगरी समाज हॉल जवळ, पनवेल, रायगड महाराष्ट्र – ४१० २०६ येथे छापून मु. पो. पोयंजे, ता. पनवेल , जि. रायगड, महाराष्ट्र – ४१० २०६ येथून प्रकाशित केले. लेखांतून व्यक्त होणाऱ्या मतांशी संपादक सहमत असतीलचं असे नाही. सर्व वाद पनवेल न्याय कक्षेत. ( ८३६९३९४३७२ / ९१३६५३९५६० ) / Facebook :- vijay gaikar / Whatsapp No. ९१३६५३९५६० /
संपादक : विजय चंद्रकांत गायकर Email Id :- Gaikarvijay26@gmail.com RNI No. MAHMAR/2013/48622